स्वयंमस्पष्ट अभिप्रायासह परिपुर्ण प्रस्ताव

सादर करणेबाबत.

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**आदेश क्र.** मनपा/आयुक्त/ 82 /2019-20

आयुक्त यांचे कार्यालय

दि. 05/11/2019

**कार्यालयीन आदेश**

महापालिका कामकाजासंदर्भात विभागाकडून वरिष्ठांकडे अंतिम मान्यतेस्तव संचिका(प्रस्ताव) सादर करण्यात येते. सदरचे प्रस्ताव हे परिपूर्ण माहितीसह, अधिनियम/कलम, शासन आदेश, मा. न्यायालयाचे आदेश, पालिकेचे ठराव, आर्थिक तरतुद, कामाची निगड, प्राधान्य यांचा स्पष्ट उल्लेख करुन वस्तुस्थिती दर्शक व स्वयंमस्पष्ट अभिप्रायासह वरिष्ठांकडे मान्यतेस्तव सादर करणे अपेक्षित असते.

परंतु नस्ती/प्रस्ताव मान्यतेसाठी प्राप्त् झाले असता ते मोघम व त्रोटक माहितीसह असल्याचे निदर्शनास येते, ही बाब कार्यालयीन कामकाजाशी अनुसरुन नाही.

या आदेशाव्दारे आपणांस अवगत करण्यात येते की, विभागाकडील संचिका(प्रस्ताव) वरिष्ठांकडे मान्यतेस्तव सादर करताना प्रस्ताव हे संपूर्ण परिपूर्ण माहितीसह, अधिनियम/कलम, शासन आदेश, मा. न्यायालयाचे आदेश, पालिकेचे ठराव, आर्थिक तरतुद, कामाची निगड, प्राधान्य यांचा स्पष्ट उल्लेख करुन वस्तुस्थिती दर्शक व स्वयंमस्पष्ट अभिप्रायासह असावेत. जेणे करुन प्रकरणाचा निपटारा करणे सोयीचे होवून प्रशासकीय कामकाजास गती प्राप्त होईल.

जे अधिकारी व त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांचे पालन न करताना मोघम प्रस्ताव वरिष्ठांकडे मान्यतेस्तव सादर करतील त्यांचे विरुध्द नेमून दिलेल्या कामात जाणीवपुर्वक हलगर्जीपणा केल्याचे गृहित ठरवून पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

(बालाजी खतगांवकर)

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका.

प्रति,

1) अतिरिक्त आयुक्त

2) सर्व विभाग प्रमुख/खाते प्रमुख

3) संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी

4) स्थळ प्रत

Scanned with CamScanner